**जिल्हा परिषद, गोंदिया**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**सनदी लेखापाल संस्था नियुक्ती सुचना**
**सुचना क्रमांक-जिप/जिपास्वमि/लेखा/ ०३ /२०२१, दि.०९/०८/२०२१**

**संदर्भ:- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्रं.जस्वप्र-०२/प्र.क्रं६३/पापु-११, दि.१९/६/२०१७.**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष अंतर्गत सन २०२०-२१ या वर्षाचे खालील प्रमाणे योजना निहाय वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्यात तयार करावयाचे आहे. सदर काम करून देण्यास्तव नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी निवड केलेल्या सनदी लेखापाल यांचे कडून अर्ज दिनांक-२४/०८/२०२१ पर्यंत खाली नमुद अटी व शर्तीला अधीन राहून मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | योजनेचे नांव | स्तर | संख्या | देय शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) सन २०२०-२१ चे लेखापरिक्षण-<br>a) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)<br>b) जागतिक बँक निधी | जिल्हास्तर | ०२ | प्रति रू. ५०००/- इतके एकत्रित (ठोस) |
| | | तालुकास्तर (SBM/WB) | ०८ | एकुण खर्चाच्या ०.०१% किंवा किमान रू. २५००/- प्रती योजना |
| | | ग्रामपंचायत स्तर (SBM/WB) | ५४७ (अंदाजित) | प्रती ग्रामपंचायत रू. १०००/- |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०२०-२१ चे लेखापरिक्षण | जिल्हास्तर | ०१ | एकुण खर्चाच्या ०.०१% किंवा किमान रू. २५००/- प्रती योजना |
| | | तालुकास्तर | ०८ | एकुण खर्चाच्या ०.०१% किंवा किमान रू. २५००/- प्रती योजना |

अटी व शर्ती -

१. सनदी लेखापाल नियुक्तीचा प्रस्ताव हा दिनांक-२४/०८/२०२१ पर्यंत सायं.-३.००वाजे पर्यंत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद गोंदिया यांचे कार्यालयात रजिस्टर पोस्टाने पोहोचतील या बेताने किंवा प्रत्यक्ष सादर करण्यात यावे. मुदती नंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कार्यालयाकडून स्विकारण्यात येणार नाहीत.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्रं. जस्वप्र-०२/प्र.क्रं. ६३/पापु-११, दि. १९/०६/२०१७ या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील. तसेच या शासन निर्णयातील Annexure-१ मधील मुद्दा क्रं. १३ अन्वये विहित केलेप्रमाणे किमान अर्हता असणे आवश्यक आहे.

३. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद गोंदिया या कार्यालयाचे पुर्वी लेखापरिक्षण केलेल्या सनदी लेखापाल यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

४. संदर्भिय शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित परिशिष्ट "अ" (Annexure-A) नमुना अर्ज Download करून स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सादर करावे.

५. विहित नमुना अर्ज "अ" (Annexure-A) सोबत खालील स्वसाक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे.
   a. Number of FCA / ACA associated with the firm
   b. CA Firm Registration Certificate
   c. Assignments of State / Central sponsored Programs conducted by the firm during last Five Years
   d. Number of Article with the firm
   e. Office of the firm with the division or the district (Address Copy)
   f. Statement for Annual Turnover of the firm on last 5 years
   g. CAG EMPANELMENT Letter for year 2020-21
   h. Certificate attach as per term & condition 22 number as below

६. सनदी लेखापाल यांचेकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करून गुणानुक्रमानुसार जास्त गुणधारक सनदी लेखापालास नियुक्ती देण्यात येईल.

७. लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रपत्रामध्ये तयार करणे बंधनकारक राहील.

८. सनदी लेखापालाची नियुक्ती केल्यानंतर जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र विहित मुदतीत तयार करून जिल्हा कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. त्याच प्रमाणे ग्रामपंचायतींची संख्या वेळेनुसार कमी किंवा जास्त होऊ शकतील याची नोंद घ्यावी.

९. सनदी लेखापाल संस्थेने ग्रामपंचायतीस वैयक्तिकरित्या भेट देणे व लेखा परिक्षण व्यवस्थापक यांनी स्तरनिहाय एकुण ग्रामपंचायतीच्या २०% ग्रामपंचायतीचे स्वयं पर्यवेक्षण करणे आवश्यक आहे.

१०. निवड करण्यात आलेल्या सनदी लेखापाल यांचे मार्फतच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) चे जिल्हा स्तरावरील तसेच तालुकास्तर व ग्रामपंचायत स्तरावरील संपुर्ण लेखापरिक्षण अहवाल तयार करून देणे बंधनकारक राहील. इतर लेखापालांकडून लेखापरिक्षण अहवाल तयार करून घेतल्यास सदर लेखापरिक्षण अहवाल मान्य करण्यात येणार नाही.

११. सनदी लेखापालाचे शुल्क शासनाने टरवून दिल्यानुसार देय राहील, अतिरिक्त TA / DA दिल्या जाणार नाही.

Scanned by CamScanner

१२. लेखापरिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडून स्विकृत केल्यानंतरच त्याबाबत देयकाचे भुगदान करण्यात येईल. यापुर्वी कोणत्याही प्रकारचे अग्रीम कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

१३. कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून सात दिवसाचे आत रू. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती बाबत करारनामा करणे बंधनकारक राहील.

१४. सनदी लेखापालांची प्रत्येक योजना निहाय स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल ०३ प्रतीत दि. ३०/०९/२०२१ पूर्वी सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत लेखापरिक्षण अहवाल सादर न करण्यास सनदी लेखापालांचे शुल्कात १०% कपात करण्यात येईल.

१५. सनदी लेखापालांना सदर अहवालात दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करून खालील बाबी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

i) योजनांच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचा अद्यावत अभ्यास करून त्या अनुषंगाने लेखा तपासणी करण्यात आली आहे.
ii) शासनाचे अनुदानाचे वितरण निश्चित प्रमाणानुसारच करण्यात आलेला आहे.
iii) लेखा तपासणी कालावधीत योजनेचा पैसा ज्या बँकेत ठेवलेला आहे त्या बँकेशी ताळमेळ करण्यात आलेला आहे.
iv) जिल्हास्तरावर सर्व तालुक्यांसाठी एकत्रित भत्ता नोंदवही अद्यावत ठेवण्यात आली आहे.
v) कोणत्याही अग्रिम रक्कमा परस्पर खर्च म्हणून दाखविण्यात आलेला नाही.
vi) एका योजनेचा निधी अन्य योजनेकडे वळविण्यात आला नाही.
vii) एका योजनेकरीता एकच बँक खाते ठेवण्यात आलेले आहे.

१६. प्राप्त प्रस्ताव हे गुणानुक्रमानुसार मंजूर करणे तथा सर्वच अर्ज कोणतेही कारण न दाखविता (दर्शविता) रद्द करण्याचे अधिकार करण्याचे व नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता, जिल्हा परिषद गोंदिया यांना राहील.

१७. सनदी लेखापाल यांना देण्यात आलेले कार्यारंभ आदेश कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांना राहील.

१८. कोणत्याही तक्रारीकरीता न्यायालयीन क्षेत्र हे जिल्हा गोंदिया, महाराष्ट्र राहील.

१९. अर्ज सादर करणा-या व्यक्तीला किंवा संस्थेला अर्ज फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार -ाही.

२०. वेळोवेळी प्राप्त शासन निर्णय / शासन परिपत्रक / मार्गदर्शक सुचनानुसार लेखापरिक्षणा बाबतची कार्यवाही करावी लागेल.

२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्रं.जस्वप्र-०२/प्र.क्रं६३/पापु-११, दि.१९/६/२०१७ या शासन निर्णयामध्ये नमूद असलेले इतर सर्व बाबी या सनदी लेखापाल निवड प्रक्रियेला तसेच लेखापरिक्षणाला लागु राहणार आहेत.

२२. अर्जासोबत सनदी लेखापाल / त्यांचे फर्म यांनी खालीलप्रमाणे तिन बाबींकरीता लेखी प्रमाणपत्र स्वाक्षरीसह प्रमाणित करून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे-

i) सनदी लेखापाल किंवा त्यांचे फर्म गेल्या १० वर्षाच्या कालावधीत वैयक्तिक किंवा गंभीरपणे काळ्या यादीत (Black Listed) नसावे. किंवा केंद्र, राज्य सरकार किंवा केंद्र राज्य सरकार पुरस्कृत कोणतीही संस्था, कोणत्याहि बाह्य सहाय्य प्रकल्प, सहकारी सोसायट्यांच्या बँका किंवा कंपनी कायद्या अंतर्गत बंदी घातली नाही.
ii) चार्टर्ड अकाउंन्टट किंवा त्यांचा फर्म किंवा त्यांच्या फर्मच्या कोणत्याहि भागिदारा विरुद्ध चार्टर्ड अकाउंन्टट किंवा त्यांच्या फर्मच्या कोणत्याही भागीदाराविरोधात प्रलंबित किंवा कारवाई सुरु झालेली नाही.
iii) चार्टर्ड अकाउंन्टट किंवा त्यांची फर्म कोणत्याही बँक किंवा वित्तिय संस्थेने स्वयं: घोषित (willful) डिफॉल्टर म्हणून घोषित केलेली नाही.

शासन निर्णयानुसार सनदी लेखापालाच्या नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात येईल. व अधिक माहितीसाठी सदर संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करावे.

वर नमूद केलेल्या योजनेकरीता लिफाफ्यात प्रस्ताव सादर करावे. लिफाफ्यावर "Application for Appointment of CA Firms / Auditors for Scheme Under DWSM ZP Gondia" नमुद करण्यात यावे.

**अर्ज सादर करावयाचा पत्ता - जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), पतंगा मैदान, आमगांव रोड, प्रशासकिय ईमारत १ ला माळा, जिल्हा परिषद गोंदिया-४४१६०१, दुरध्वनी क्रमांक-०७१८२-२३४०५६**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पाणी व स्वच्छता)
जिल्हा परिषद, गोंदिया

(प्रदीपकुमार डांगे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया

Scanned by CamScanner